(A)

*गुलाब-वाटिका - १९*

# आर्य-संस्कृती
# जागतिक अस्तित्व









श्रीगुलाबराव महाराज जीवनशताब्दी प्रकाशन

२०-९-२०१५

*कृष्ण-माधव*

*__संपर्क__ : नारायण मोहोड ०९८२२४४०९५१*

*श्रीगुलाबरावमहाराज-ट्रस्ट,आळंदी-देवाची,जि.पुणे.*

**रु.१०**



(B)



*श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार*

## श्रीबाबाजीमहाराज पंडित

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला.महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला-

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन्पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं
अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!



(C)

श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स.१८८१ ते १९१५)

**''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''**

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड.चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.



(D)

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे.तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला.आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले. ०००



**युक्तीने पटवून देण्याचा**
**माझा बाणा आहे.**

**संपर्क : श्रीरंग घटाटे.**बोलेपेट्रोलपंप,अमरावतीरोड,सिव्हिल लाइन नागपूर ४०००१.
टे-९३७२५२९७७० / ०७१२-२५३३९९७

# प्राचीन आर्य-संस्कृतीचे जागतिक अस्तित्व

संपूर्ण विश्वात ३००० वर्षापूर्वी एकच संस्कृति होती तिच्या अस्तित्वाचे पुरावे उत्खननामधे मिळत आहेत. त्यासंबंधी पाश्चात्यांनी अभ्यासपूर्वक अनावरण केले आहे. त्यांचा आधार घेऊन श्रीगुलाबराव महाराजांचा 'विश्वव्यापक आर्यसंस्कृतीचा सिद्धांत हाच खरा आहे हे सिद्ध होते. त्यासंबंधीचे संदर्भ थोडक्यात पुढे मांडले आहेत.

## १. ग्रीस

### ग्रीक भाषेचा उगम संस्कृतातून

**कर्नल टॉड व कर्नल विल्फोर्ड-**

''ग्रीक भाषा संस्कृतापासून निघाली आहे असे पुष्कळ भाषा शास्त्रज्ञांचे मत आहे. ग्रीक लोकांचे मूलस्थान भरतखंडच होय'' हे मत प्रथमतः कर्नल टॉड व कर्नल विल्फोर्ड यांनी प्रतिपादन केले.

(या मताची परिपूर्ती करून **मि.पोकॉक** यांनी





**''इंडिया इन ग्रीस''** हा ग्रंथ लिहिला)

**पोकॉक -**

होमरच्या काव्यात वर्णिलेल्या समाजव्यवस्थेचे सूक्ष्म व विस्तृत परिक्षण केल्यानंतर ही व्यवस्था आशियाटिक विशेषतः भारतीय स्वरूपाची आहे.

येवढेच नव्हे तर दोन्ही देशातील भाषा- धर्म- तत्त्वज्ञान- राजसंस्था किंबहुना पर्वतांची व नद्यांची नावे यातही विलक्षण साम्य आहे.

## २. रोम

### राम पासून रोम

**पोकॉक -**

''प्राचीन ग्रीकांप्रमाणे प्राचीन रोम लोकांच्या देवदेवता या दुसऱ्या कोणी नसून ''हिंदुस्थानातील प्राचीनतर वीरपुरुषांचीच ती दैविक रूपांतरे'' होत.

रोमन लोक ज्या ट्रोजनांचे वंशज, ते स्वतः ही हिंदुस्थानातून आर्य वसाहत वाल्यांचेच वंशज होते.

'रोम' नाव वास्तविक लॅटीन नाही. त्याचे मूळचे रूप 'राम' आहे. संस्कृतातील 'आ' चा लॅटीनमध्ये





'ओ' होतो.'' - **मि. पोकॉक**
(इंडिया इन ग्रीस पा. १४२-१७६६)

## ३. इटाली

### धर्मविधींचे साम्य

**कौंट जार्नस्टजर्ना -**

''ग्रीसमध्ये भारतीयांची वसाहत झाली त्याच काळाचे सुमारास त्यांचेपैकी काही लोकांनी इटालीतही वस्ती केली, व हेच प्राचीन **''इस्ट्रूक्सन''** लोक होत यांचा धर्म व त्यातील अनेक धर्मविधी यांचे इजिप्शियन व हिंदुधर्मविधींशी विलक्षण साम्य आहे.'' (भा.श्रे.१०५)

## ४ जर्मनी

### भाषासाम्य

### मूळपुरुष मेनस = मनु

**मिस 'मॅनींग' -**

''जर्मन लोक 'ट्युटोन' वंशाचे असून या वंशाचे मूळ पुरुष कृतथि मेनस होता असे जर्मन पुराणकथात म्हटले आहे. भारतीय आर्यातही मनुः= मनुस् = मानुस हाच सांप्रतच्या मन्वंतरातला आदिपुरुष मानल्या





जातो. इंग्रजीतील मॅन Man व जर्मनभाषेतील Mann हे शब्द संस्कृतातील मनुस् शब्दापासून झालेले असून जर्मनमधील Mansh व संस्कृतातील 'मानुष' हे शब्द एकच होत.'(ॲनशंट ॲण्ड मेडीएव्हल इंडिया भा१पा११८)

### वेश आणि प्रातःस्नान

**कर्नल टॉड -**

''प्राचीन जर्मनांचा सैल व फैलावलेला झगा आणि डोक्यावर गांठ देऊन बांधलेले केस हे दोन्ही प्राचीन ब्राह्मणांच्या सारखेच होते.

तसेच प्राचीन जर्मन लोकांत सकाळी निजून उठल्याबरोबर शौचमुखर्जनानंतरचे पहिले कृत्य म्हणजे 'प्रातःस्नान' हें असे. ही चाल अर्थातच जर्मनीसारख्या थंड देशात उत्पन्न होणे शक्य नसून ती आशियाखंडातील उष्ण प्रदेशातूनच आली असावी.'' (राजस्थानचा इतिहास भा. १ पा. ६३ व ८०)

### सूर्योपासना- प्रेतदहन- सतीची चाल- पुनर्विवाह

**ग्रीक इतिहासकार-'टॅसिटस'** - ''प्राचीन जर्मन सूर्य-चंद्र-अग्नी यांच्या उपासना करीत. प्रेत न

पुरता दहन करीत. त्यांच्यात **सतीची चाल** असून **पुर्नर्विवाह** नव्हता.'' (भा.श्रे.१०६)

**शर्मन् - जर्मन**

''ब्राह्मणांच्या प्राचीन नावापुढे बहुधा शर्मा हे पद लावीत. ब्राह्मणापासून 'ब्राह्मण्य' हे जसे भाववाचक (किंवा जाति वाचक) नाम झाले आहे तसेच 'शार्मण्य' हे ही नाव बनले **श ज य** ही तीन अक्षरे पुष्कळ ठिकाणी समान मानून उपयोग होतो. म्हणून शार्मण्याचे जर्मन झालेले आहे असे काही भाषापंडितांचे मत आहे.'' -(भा.श्रे.१०६)

**सॅक्सन - शकसुनु**

**कर्नल टॉड -**

''जर्मनीतील 'सॅक्सन' लोकही वास्तविक भरतखंडाच्या वायव्यभागात राहणाऱ्या शकांचेच वंशज होत 'शकसुनुः'' सॅक्सन यांचे सादृश्य उघडच आहे.

शिवाय हिमालय =स्वर्ग प्राचीन सॅक्सन लोकांत स्वर्गास ''हिम्मेल (Hummel) असे नाव असून तें ''हिमालया'' पासूनच झालेले स्पष्ट दिसत आहे.





गोपीकृष्णांची चित्रे

**कर्नल टॉड -**

''इंग्लंड वगैरे देशातला अत्यंत प्राचीन सेक्सन प्रार्थनामंदिरावरील जुन्या चित्रांचे हिंदुस्थानातील कन्हया व गोपी यांच्या चित्रांशी असलेले सादृश्य पाहून असे वाटते की सॅक्सन लोकांचे पूर्वज असलेल्या स्कँडेनिव्हियातल्या 'अश्र' लोकांनी भारतातून जातांनाच ही चित्रे बरोबर नेली असावी.''

(राजस्थानचा इतिहास भा. १ पा. ५७)

**५. हंगेरी**

**भाषा - चालीरीती - वंश**

''अर्वाचीन हंगेरीयन लोकही तेथील प्राचीन हिंदू वसाहतवाल्यांचेच वंशज असून त्यांची भाषा, चालरीत, वंश ह्यांचे मूळ संस्कृतात सांपडेल असे तिबेटी भाषेचा कोश तयार करणाऱ्या एका युरोपियन पंडिताने प्रस्तावनेत लिहिले आहे. (भा. श्रे. १०६)





**६. स्कँडनेव्हिया - नॉर्वे स्वीडन**

**कौंट जॉर्नस्टजर्ना -**

''स्कंदनाभि या देशातील प्राचीन पूर्वज हिंदुस्थानातून आलेले क्षत्रिय होते. स्कंदनाभिपासून वरील नाव झाले आहे. ''स्कंद'' ही क्षत्रियांची देवता असून (शिवपुत्र कार्तिकेयाचे एक नाव) 'स्कंदनाभि' हे एखाद्या क्षत्रिय कुलाचे नांव असावे.''

**एद्द - वेद**

**कौंट जॉर्नस्टजर्ना -**

स्कँडेनेव्हियन लोकांचा प्राची धर्म ग्रंथ **'एद्द'** (Edda) नावाचा असून त्याचे 'वेदाशी' असलेले साम्य स्पष्टच दिसत आहे. (थियॉगनी ऑफ हिंदूज पा. १०८)

**असिगर्ड**

**कर्नल टॉड -**

एद्द या ग्रंथात असे लिहिले आहे कि, स्कँडेनेव्हियात प्रथम वसाहत करावयास **निटी = जित** लोक आले असून त्यांचे दुसरे नाव ''**अशी**'' असे होते. व त्यांचे मूळ स्थान **'असिगर्ड'** होते ''असिगर्ड = असिगड''





होय. खिस्तपूर्व ५०० सुमारास 'आदित' स्कँडेनिव्हियात आला. व त्याचा वारस ''गौतम'' होय. अखेरचा बुद्ध महावीर असून (खि.पू.५३३) त्याचाही पट्टशिष्य गौतमच होता.

**पुराणे**

**कर्नल टॉड -**

''स्कँडेनेव्हियनांची प्राचीन वीररसप्रधान पुराणे व काव्ये यांचे इकडील (राजस्थान) तसल्या वाङ्मयाशी पुष्कळ साम्य आढळते. (राजस्थान इतिहास भाग १ पा.६४-६८)

**वारांची नावे**

**कौंट जॉर्नस्टजर्ना -**

''सातही वारांना नावे देण्याची तऱ्हा भरतखंड व स्कॅन्डेनेव्हिया यांत सारखीच दिसून येते. (कोष्टक दिले आहे. यावरून स्कँडेनेव्हियन पुराण कथांचा मूळ उगम भरतखंडच होय.'' (कौंट जॉर्नस्टजर्ना हे स्वतःला स्कँडेनेव्हियन म्हणवितात)

- थियॉगनी ऑफ दि हिंदूज (भा.श्रे. १६९)

**६. इंग्लंड**

**बौद्ध ब्राह्मण : 'ड्रुइड'**

''या देशातल्या प्राचीन लोकांचा पहिला सुगावा **'ड्रुइड'** नावाचे जे मठवासी असत त्यांच्या हकीकतीत सापडतो. पोकॉक वगैरे शोधकांच्या मते हे मूळचे ''बौद्धधर्मीय'' ब्राह्मण पुरोहित असून काश्मिर वगैरे प्रांतातल्या रजपूत जाती बरोबर घेवून ते ब्रिटनमध्ये वसाहत करण्यास गेले.

**पुनर्जन्म - तीन देवता**

''ड्रुईड लोक पूर्वजन्म मानीत. विश्वाची उत्पत्ती, पालन व क्षय करणाऱ्या तीन भिन्न देवताही त्यांच्यात होत्या. धर्मज्ञानाचे रक्षण व त्याचे अध्यापन यांनाही त्यांनी सर्वस्वी आपल्याकडेच ठेवले होते.''

**शापदान**

**कौंट जॉर्नस्टजर्ना -**

''ड्रुइड लोक राजाचाही मुलाहिजा न ठेवता त्यास शाप देत. ''कोयत्याच्या झपाट्यापुढे गवत जसे तुटून पडते तसे राजेलोक ड्रुइडांच्या शापामुळे जमिनदोस्त होत.''



Abanti
(Cossiei)



असे वर्णन आहे. - (थियॉगनी ऑफ हिंदूज पा.१०४)

**हरहर महादेव**

**पोकॉक -**

''ब्रिटनातील लोकांचा सुप्रसिद्ध जयघोष 'हुरा-हुरा' हा तेथील प्राचीन राजपुतांच्या 'हरो हरो' (हर-हर) या युद्धातील सिंहनादाचाच अपभ्रंश होय.'' - इंडिया इन ग्रीस (पा.१०४)

**बौद्ध अवशेष**

ब्रिटनातील **स्टोन हेज** नावाचे इमारतीचे प्राचीन अवशेष हे या बौद्धधर्मीय लोकांचेच होत.

**इंदुवंशीय**

**पोकॉक -**

''ड्रुईड = द्रुइद-द्रुई-देश-द्रुह्युदेशीय; अशी यांची पूर्वपिठीका असावी, असे कित्येकांचे अनुमान आहे. द्रुइद लोक अर्धचंद्र चिन्हे वापरीत. यावरून ते इंदुवंशीय असावेत.'' (इंडिया इन ग्रीस)

**रोमनांनी ब्रिटन जिंकल्यानंतर**

''हे द्रुइद लोक 'सॉईल ऑफ मॉन' मधे जावून राहिले.





त्या नावाचे प्राचीनरूप **'सॉईल ऑफ मॉन' = मॉनचे बेट'** असे होते. मॉन = सेंट असा अर्थ असून तो संस्कृत 'मुनी' सारखाच आहे. अर्थात् - **'सॉइल ऑफ मॉन = द्रुइदांचे 'मुनिद्विपच'** होय.'' (इंडिया इन ग्रीस)

कित्येक पाश्चात्य पंडितांनी केल्टीक व संस्कृत भाषांचे व त्यातील प्रयोगांचे विलक्षण साम्य दाखवून त्या भाषा बोलणाऱ्यांचा निकट संबंध सिद्ध केला आहे.

**७. पॅलेस्टाईन**

**प्राचीन लोकांचे साम्य**

**पोकॉक -**

''पॅलेस्टाईन मधील इस्त्रायली लोकांच्या पूर्वेची वस्ती तार्तर देशातून आलेली असून तार्तर व हिंदुस्थान यातील गांवे वगैरेंची पुष्कळ नावे एकसारखी आढळतात.

यहुद्यांपूर्वीच्या पॅलेस्टाईन मधील लोकांची व हिंदुस्थानच्या प्राचीन लोकांची मूर्तिपूजा सारख्याच स्वरूपाची आहे. आणि पॅलेस्टाईनमधील प्राचीन क्षत्रिय व भरतखंडातील राजपूत यांचे मधे चालीरीतीतही





विलक्षण साम्य आढळून येते. म्हणून पॅलेस्टाईन मधील प्राचीन लोक हिंदुस्थानातून निघून तार्तर देशातून तेथे वसाहतीस गेले असावे'- इंडिया इन ग्रीस (पा.२२९)

**८. आशियामायनर**

**खाल्डिया - कुलदेव**

**कौंट जॉनेस्टर्जनॉ -**

''आशिया मायनर या प्रांतातील प्राचीन खाल्डियन लोक हे हिंदुस्थानचेच प्राचीन आर्य होते. कुलदेव नामक ब्राह्मणांनी वसाहत केलेला जो देश तो अपभ्रंश होऊन 'खाल्डिया' बनला. प्राचीन **खाल्डीयन** व **बाबिलोनियन** लोकांची संस्कृती ही हिंदुस्थानातूनच आली होती. - थिऑगनी ऑफ हिंदूज (भा.श्रे.१६८)

**मि. पोकॉक -**

''पूर्वीच्या ट्रोजन महायुद्धांत अवंती (Abanti) नावाच्या एका जातीचे योद्धे सामील झाले होते ते माळव्यातील सुप्रसिद्ध अवंतीच्या राज्यातलेच होते.'' *-इंडिया इन ग्रीस (पा. ३३)*

**९. इराण**

**पर्शिया - परशुराम**

**मि. पोकॉक -**

''परशुरामाचे अनुयायी परसु नावाचे असून त्यांचे मुख्य शस्त्र परशु हे होते. यांनी भरतखंडातून येऊन पर्शियात वस्ती केली व त्या देशास हे नाव दिले शिवाय **इफ्रेटीस** हे तेथील मुख्य नदीचे नावही यु-भारत-ईश या शब्दापासूनच निघालो आहे.'' *इंडिया इन ग्रीस (पा. ४५)*

**मॅक्समूलर -**

''हिंदुस्थानच्या वायव्य उत्तरभागातून येऊन प्राचीन इराणी लोकांनी इराणात वस्ती केली आणि आर्य हा शब्दच नव्हे तर काही अंशी धर्माच्या बाबतीतही कांही विषय त्यांनी 'झोरीयास्ट्रीयन' धर्मात शुद्ध स्वरूपात राखले.'' (सायंस ऑफ लँग्वेज २४३-५३)

**मनुस्मृती**

प्राचीन इराणी किंवा पल्हवी जातीचे लोक मूळचे भारतीय क्षत्रियच असून कर्मलोपाने वृषल झाले असे





'मनुस्मृतीत' (१०-४३-४५) म्हटले आहे.

संस्कृत व झेंद भाषांचे अत्यंत निकटचे साम्य आहे झेंदच्या कोषातले१०शब्दातले निदान ६-७ शब्द तरी शुद्ध संस्कृत असतात हे पाहून **सर विलीयम जोन्स** यास फार आश्चर्य वाटले.

**ऐल - ऐर - एराण**

**मि.हौग -**

चंद्रवंशीय बुधाचा पुत्र पुरूरवा. या पुरूरव्यास त्याच्या आईच्या 'इला' नावावरून 'एल' किंवा 'एर' म्हणतात. त्याचे वंशज आपणास 'एराण' व नंतर 'इराण' म्हणू लागले. इराण व तुराण यांचेमध्ये मोठे युद्ध झाल्यावर प्राचीन इराणी लोक इराणात वसाहत करण्यास आले असे इराणचे जुने इतिहासकार लिहितात.(भाश्रे. १०२)

**धर्म संकल्पनाचे साम्य**

**मि.हौग -**

तैग्रीस नदीवर कौसी (Cossiei) नावाचे लोक प्राचीन काळी राहत होते. ते काशीहून तेथे गेले असे इतर शोधकांचे मत आहे. त्यांच्यात ब्राह्मणी धर्मातील काही





बाबी संबंधाने मतभेद झाला व तो पुढे तीव्र होऊन त्यावर धार्मिक रणे माजली आणि अखेरीस प्राचीन इराणी लोक इराणात जावून राहिले. अश्या दोन्ही लोकांच्या देवदेवता - विभूती - यज्ञविधी - गृहसंस्कार यांची तुलना करून मि. हौग यांनी वरीलप्रमाणे मत दिले आहे.(Essay on the Parsees p.287.288)

**११. इस्लामपूर्व अरबस्थान**

**अरेबिक लीपीतील भागवत**

**डॉ. कृ.मा.घटाटे, नागपूर -**

डिसेंबर १९८५ मध्ये लायडन (हॉलंड) येथे भक्तिकॉन्फरन्स झाली. तेथून २० किलोमीटर असलेले एका विद्वान संस्कृत प्रोफेसरच्या जन्मशताब्दी निमित्त, त्याचे ग्रंथालय पाहण्यात आले.

तेथे मोहमद पैगंबर पूर्व काळातील एक अरेबिक भाषेत लिहिलेले एक मोठे पुस्तक आहे. त्यातील एक पान फ्रेमकरून भिंतीवर लावले आहे. त्या पानात वरील अर्ध्याभागत श्रीकृष्णलीलांची रंगीन चित्रे काढली आहेत आणि खाली भागवतातील वर्णने अरेबिक





भाषेत व लिपीत लिहिलेले आहे. याचा अर्थ असा की १४ शे वर्षापूर्वी अरबस्थानात संस्कृत भाषा होती येवढेच नव्हे तर भागवताचे अध्ययनही होत असे.

**१२. तुर्कस्थान**

**तुर्वसु राजाचे वंशज**

**मॅक्समूलर -**

'शापग्रस्त 'तुर्वसु' व त्यांचे वंशज हे तुराणीयनांचे प्राचीन पूर्वज होत. (सायन्स ऑफ लँग्वेज पा. २४२) कित्येकाचे मते तुर्क तुरुष्कांचे वंशज होत.

**१३.खोरासान**

चंद्रवंशाचा यादव व बाल्हीक शाखांनी भारतीय युद्धानंतर खोरासान मधे राज्ये स्थापिली. असे जेसलमीरच्या राजपूत इतिहासात लिहिले आहे. (भा.श्रे.१०५)

**१४. बलीराजा**

पुराणातील बलीराजा = बोल = बेल याचे साम्राज्य असीरीयनांचा प्राचीन राजा बोले किंवा बेल (Boal - Bel) ह्या नावाचा होता. हा राजा म्हणजे भरतखंडावर व कांबोडियापासून ग्रीसपर्यंतच्या देशांवर

प्राचीन काळी ज्याचे विस्तीर्ण साम्राज्य होते. तो ''बली राजा''च होय. असे कित्येक पाश्चात्य ग्रंथकारांचे म्हणणे आहे. (भा.श्रे.१०३)

## १५. इजिप्त व इथिओपिया
## सिंधीलोक व प्राचीन इजिप्शीयन

**कर्नल अल्काट व पोकॉक** - ''आपण पंत म्हणून देशातून इजिप्तात आलो असे प्राचीन इजिप्ती लोकांचे म्हणणे आहे. या मूळ देशाचे वर्णन '**वर-एल-बाबरी**' येथील '**हासली-टोप**' राणीच्या देवालयाच्या भिंतीवर चित्रलीपीने लिहून ठेवलेले आहे. या वर्णनात त्या मूळ देशातील पशू, वनस्पती व विशेषतः किंमतवान लाकडे यांची जी नांवे व माहिति आली आहे. ते पशु व ती वनस्पती निव्वळ हिंदुस्थानातीलच आहेत. ते इतर देशात उत्पन्नच होत नाहीत असे दिसते. अर्थात इजिप्ती लोकांचे प्राचीन पूर्वज हिंदुस्थानातून विशेषतः सिंधुनदीच्या मुखाजवळील भागातून तिकडे गेले असे दिसून येते. हे लोक ८-१० हजार वर्षापूर्वी जहाजात बसून समुद्रकिनाऱ्यांनी सफर करीत जे निघाले ते





बलुचीस्थान- इराण- अरबस्थान यांच्या किनाऱ्यानी प्रवास करीत करीत व इराणचे आखात- अरबीसमुद्र- तांबडासमुद्र पहात पहात अखेर इजिप्तच्या ज्युबिया व इथियोपिया यांच्या पूर्व किनाऱ्यावर उतरले असे **कर्नल अल्काट** थिऑसफीस्ट मार्च १८८१ व **पोकॉक** (इंडिया इन ग्रीस पा. ४२) यांचे म्हणणे आहे.

**फिलोस्टेटस्-**

''हिंदुस्थानातील एका राजाचा विश्वासघाताने खून केला म्हणून काही लोकांस भारतातून हाकून देण्यात आले त्यांनी इथियोपियात वस्ती केली.''

''सिंधू नदीच्या काळाबागजवळील प्रवाहाला नीलाब (नील+आप) हे नांव आहे येथील लोकांनी इजिप्तमध्ये वसाहत केल्यानंतर तेथील मोठ्या नदीसही (नाईल-नीला) हे नाव दिले.''

## नांवे, शिल्प, भाषा यांचे साम्य

**पोकॉक** - इजिप्तमधील इतर नद्यांची व प्रांताची नावेही हिंदुस्थानच्या नद्यांचे व शहर व प्रांतांचे नांवावरून पडली आहेत. काही राजांची नावे '**रामेसीस**' भारतीय





रामवंशावरून पडली आहेत. उभय देशातील शिल्पपद्धतीचे विषय व स्वरूप यांचेही निकट साम्य आहे व प्राचीन इजिप्ती शब्दांचे रूपांतर आहे व निकट साम्यही आहे. व प्राचीन इजिप्ती शब्दांचे रूपांतर व भाषांतर तर संस्कृतातून सहज व स्वाभाविक रीतीने होते.'' (इंडिया इन ग्रीस पा. २०)

## वांशिक संकल्पना

**मि. ब्लूमेनवास**

यांनी जगातील निरनिराळ्या वर्णाच्या लोकांच्या डोक्यांच्या कवट्यांचा संग्रह केला असून त्यातील भारतीय व इजिप्ती लोकांच्या कवट्यांचा आकार व रंग यात विशेषच साम्य दिसून येते. असा **प्रो. हीरेन** यांचा अभिप्राय आहे.

(Assiatic Nations Vol. II p. 373)

प्राचीन इजिप्ती लोकांच्या रीतीभाती, समाजरचना, धर्म, समजुती राजसंस्था यांचे भारतीयांशी विलक्षण साम्य आहे असेही त्यांचे म्हणणे आहे.





## १६. आफ्रिका
## अबुसिनीया : आफ्रिकेतील नावे

अबुसिनीया व भारत ह्यांचा व्यापारी संबंध पुढेही पुष्कळ वर्ष चालू होता. अनेक हिंदू व्यापाऱ्यांनी त्या भागात जाऊन वस्तीही केली होती.**'ग्रॅबीया' व सोनिगाल'** नद्यांच्या खाडीतील मुख्य व्यापारी बंदरास जी नांवे आहेत त्यांची अंत्यक्षरे कुंड अशी आहेत. उदा. **तंबाकुंड = ताम्रकुंड.** (भा. श्रे. १००)

जर्मन ईस्ट आफ्रिकेतही मोठ्यामोठ्या पर्वतास **मौंट शंभू व मौंट मेरू** अशी नांवे दिलेली आढळतात.

**मंगोपार्कने** आफ्रिकेत केलेल्या प्रवासाचे वर्णन लिहीले असून त्यातील ज्या शहरे वगैरेंची नावे संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न आहेत त्यांची एक यादीच एशियाटिक जर्नलमध्ये लिहली आहे. (Vol IV P. 324)

## १७. दक्षिण आफ्रिका

सुन्न = सोने = सुवर्ण द. आफ्रिकेत सोन्याच्या खाणी आहेत. प्राचीन काळात द.आफ्रिकेतून भारतात सोन्याचा व्यापार असे. त्यामुळे द. आफ्रिकन भाषेत

(२५)

सोन्याला सुन्न हा शब्द रूढ आहे. युरोपियनांनी मूळच्या आफ्रिकनांना गुलाम केले आणि सोने जमिनीतून काढून हिसकून नेले. परंतु प्राचीन भारतीयांनी ते विकत घेऊन व्यापार वाढवला. हा युरोपियन व हिंदू मधील फरक आहे.

**सूर्याचा रथ**

प्राचीनकाळी मध्य आफ्रिकेत लिपी नव्हती ,संस्कृती नव्हती असे म्हणतात पण उत्खननात एक सूर्याचा रथ सांपडला आहे. याचा अर्थ मध्य आफ्रिकेत सूर्याची उपासना होती असेच दिसून येते. (डर्बन येथे १९९४ साली भरलेल्या विशाल हिंदु संमेलनातील पेपर्स मधून)

**१८. आशिया-युरोपचा उत्तर भाग**

**'सुमेरू व पेशवारून'**

**पोकॉक** - आशिया व युरोपच्या उत्तरेस राहणारे प्राचीन **''हायपर बोरियन''** लोक हे मूळ खैबरपुरहून येऊन वसाहत करून राहिलेले होते. **खैबरपुरी** लोकांची दुसरी वसाहत 'थेसली' प्रांतात **'किनिक्स'**



(२६)

नदीचे तीरी झाली होती. व ते लोकही आपणास **'खिफारा'** किंवा **'खिफेरा'** म्हणवीत.

हायपर बोरियांच्या शेजारचे लोक 'पेशवारून' हे असून त्यांनी ''तोमारोस'' पर्वताचे दक्षिणेस वसाहत केली होती. **तोमारस, सुमेरू** व **पेशवारून** लोक पेशावरचे असून त्यांचे ग्रीक भाषेत **'पासारोन'** असे रूप झालेले आढळते. (इंडिया इन ग्रीस पा.१२७-१२९)

**१९. सैबेरिया**

**यादवांचे वंशज**

**कर्नल टॉड** - 'सैबेरीयातील **'सामोयेदीज व जोदीस'** जातीचे लोक हे शाम यादवांचेच वंशज असून त्यांची भाषा संस्कृतला जवळ आहे. सायबेरीयात जातांना वाटेत मध्यआशियात ते जेथे थांबले त्यास अद्याप **यदूची डांग** (टेकडी) असे म्हणतात.

यादवांच्या काही शाखा **झाबुलीस्थान** व **समरकंद** या भागात गेल्या व **गझनी** ही त्यांनीच वसवीली. (टॉडकृत राजस्थानचा इतिहास भा.१पा.८५)



(२७)

**कृष्ण कथा**

'' जिस देश में कृष्ण को गिसनखान कहते है'' या लेखात डॉ. लोकेशचंद्र (राष्ट्रधर्म मासिक जाने १९७३) यांनी सैबेरियातील लोकबोलीतील कृष्णकथांचे वर्णन केले आहे.

**२०. अमेरिका**

श्री **चमणलाल भिक्षु** यांच्या **''हिंदु अमेरिका''** या ग्रंथात युरोपियनपूर्व अमेरिकेच्या इतिहाससंबंधी खूप माहिती आली आहे.

प्राचीन काळी बहुतेक उत्तर अमेरिकाखंड दाट जंगलाने व्याप्त झालेले होते. पण मध्य व दक्षिण अमेरीकेची स्थिती तशी नव्हती.

प्राचीन शहरे- किल्ले- पूल- तलाव- पाट- रस्ते यांचे अवशेष - **बॅरेन, हंबोल्ट** वगैरे प्रवासी व इतर संशोधक यांस तिकडे इतके सापडले आहेत की, प्राचीन काळी या खंडात अत्यंत सुधारलेले लोक राहत होते याबद्दल आता संशय राहिलेला नाही. या अवशेषांच्या शिल्पाचे स्वरूप भारतीय शिल्पपद्धतीशी फारच जुळते.



(२८)

प्राचीन अमेरिकनांच्या धार्मिक चालीरीती व समजुती यातही खूप साम्य आढळते.

१) भारतीय लोक ज्याप्रमाणे धरित्रीमाता किंवा **पृथ्वीमाता** ही एक देवता मानतात त्याचप्रमाणे प्राचीन अमेरीकन मानीत.

२) बौद्ध, हिंदू व मारवाडी लोक ज्याप्रमाणे बुद्ध, कृष्ण व अजयपाल यांच्या **दगडावर उमटलेल्या पावलांची पूजा** करतात तीच तऱ्हा मेक्झिकन लोकांत आहे.

३) **ग्रहण** - काळी राहू-केतू चंद्र सूर्यास गिळतात, या भारतीय कल्पनेप्रमाणेच अमेरीकनांची समजूत असून त्यांचा राहूकेतू **'माल-ओयो'** नांवाचा आहे.

४) **देवतासाम्य** - भारतीय शिव-काली यांचे प्रमाणे अमेरीकन धर्मसंस्थापकांचे व उपाध्यायाचे चित्रातही गळ्याभवती सर्पाची वेटोळी काढतात.

५) **गणेशपूजा** - गजवदन गणेशाच्या मूर्तीची पूजा मेक्सिकन लोकातही आढळते. हा प्रकार पाहून **'बॅरन हबोल्ट'** यांनी असे लिहीले आहे की,

It presents some remarkable and apperently not accidental resemblance with the Hindus Ganesh.

ही मेक्सिकन देवता हिंदूंच्या गणेशासारखी थेट असून हे आश्चर्यकारक साम्य केवळ आकस्मिक आलेले दिसत नाही.

६) **जलप्रलयाची कल्पना** अमेरिकनातही आहे.

७) **पृथ्वी एका प्रचंड कासवाचे पाठीवर** असून ते कासव समुद्रावर पोहत आहे व ते कासव जेव्हा समुद्रात बुडते तेव्हा पृथ्वीवर जलप्रलय होतो ही कल्पना उत्तर अमेरिकेतील रेड इंडियनात आहे.

८) **सर्प व नाग यांची पूजा** हिंदू व प्राचीन अमेरिकनातच आहे असे नव्हे तर ती इजिप्ती - सिरीयन - ग्रीक - चीनी - स्कँडेनेव्हियन या लोकांच्या पुराणग्रंथातूनही आढळते.

९) **पुनर्जन्म** - प्राचीन अमेरिकन लोक पूर्वजन्म व पुनर्जन्म ही मानीत.

१०) **भारतीय वेश** - मूळच्या अमेरिकनाचा वेश हिंदूंप्रमाणेच असून ते वाहणाच वापरीत. त्यांच्या स्त्रियांची





लुगडे नेसण्याची पद्धत थेट भारतीय होती.

११) **रामलीला / 'रामसित्वा'** - दक्षिण अमेरिकेतील ही भारतीय वसाहत केव्हा झाली हे नक्की कळत नाही पण ही वसाहत रामाचे कालानंतर केव्हा तरी झाली असली पाहिजे. कारण पेरू देशातील मूळच्या अमेरिकनांचा मोठा उत्सव उत्तर हिंदुस्थानातल्या प्रमाणे 'रामलीलेचाच' आहे. येवढेच नव्हे तर या उत्सवास ते **'रामसित्वा'** असेच म्हणतात. राम हा सूर्यवंशीय असून त्याच्या आईचे नाव 'कौसल्या' व पत्नीचे नाव 'सीता' असेच **पेरूवियन** लोक सांगतात. हे पाहून **सर विल्यम जोन्स** वगैरे शोधकास फार आश्चर्य वाटले.

### <u>हिंदु-संस्कृतीचे संस्कार</u>

* हिंदू आणि मंगोलियन आकृतीचे हजारो लोक अमेरिकेत हिंदू चालिरीती पाळतात.
* हिंदू देवता गणेश इंद्र वगैरेची पूजा करतात.
* हिंदूची शिक्षणपद्धती प्रमाणे गुरुसेवेसाठी मुलांना गुरुगृही पाठवितात.
* ब्राह्मण पुरोहित विवाह संस्कार करतात.





* प्रेताला अग्नीने दहन करतात.
* पती मेल्यानंतर सती जातात किंवा भारताप्रमाणे विधवा वैराग्य धारण करून पवित्र आचरणाने जीवन घालवितात.

या सर्वावरून एकच गोष्ट सिद्ध होते की हिंदू आणि मंगोलियन लोक प्राचीन काळी अमेरिकेत खूप संख्येने जलमार्गाने किंवा स्थलमार्गाने पोचले होते.''

**-कोलंबस,** अमेरिकेचा शोध लावणारा युरोपिअन. ('हिंदू अमेरिका' ले. चमणलाल भिक्षू)

### <u>२१. सदाचार, सत्यप्रियत्व, कठोर शिक्षा</u>

**फ्रेडरिक टॉमसन -**

प्राचीन अमेरिकन संस्कृतीचे लोक अत्यंत सदाचारी होते. स्पॅनिश लोकांना ते पाहून आश्चर्याचा धक्का बसला. ''येथील लोकांची धार्मिक भावना आणि असत्याची घृणा पाहून स्पॅनिश लोकांना अत्यंत आश्चर्य वाटले. सत्य आणि सदाचारण करण्यासाठी येथे फार कठोर नियम होते. नियम भंगासाठी शिक्षाही फार कडक होत्या ते पाहून भारतीय स्मृतिकालीन कठोर





न्यायालयीन शिक्षांची आठवण होते.

### <u>२१. माया, इंका व आस्तिक संस्कृती</u>

**भिक्षू चिमणलाल -**

१) मध्य अमेरिकेची **'माया संस्कृती'**
२) दक्षिण अमेरिकेतील **'इंका संस्कृती'**
३) मेक्झिकोतील **'आस्तिक संस्कृती'**

ह्या तिन्ही संस्कृती भारताच्या ऋषिकुल पद्धतीच्या शिक्षणप्रणाली शिकविणाऱ्या होत्या.

**मुलांना शिक्षण** - पुरोहिताकडून शिक्षण दिले जाई. मुलांना गुरुगृही पाठवित. मुले गुरुसेवा करीत. धार्मिक व नैतिक शिक्षण घेत. कठोर नियमाचे पालन केले जाई.

* ब्राह्ममुर्हूतावर उठून स्नान करणे, अघमर्षण करणे (संध्येतील पापनाशन प्रक्रिया) वगैरे नित्यक्रम असे.
* जातीनुसार वेगवेगळे शिक्षण मिळे.

**धार्मिक यज्ञ - अग्निपूजा** - युद्धकला - शारिरीक शिक्षण इ. सर्व पाहून प्राचीन भारताचीच आठवण होते.'' ('हिंदू अमेरिका' लेखक चमणलाल भिक्षू)

(३३)

## २२. रामाची विजय-यात्रा

**कर्नल टॉड -**

''जर गंगेपासून नील नदीपर्यंतच्या इतिहासावरील आवरण काढून टाकले तर असे दिसेल की, रामाची विजय यात्रा प्रथमपासून **'ऑरगोनॉटस'** प्रमाणे लक्षात येईल.

अलेक्झांडर जर खुश्कीच्या भूमिमार्गाने पंजाबपर्यंत जाऊ शकतो तर कोसल सम्राट सागरवंशाचे समुद्रराज नावाचे प्रसिद्ध असलेले ६० हजार सगरपुत्र- जे कुशल नाविक होते- ते जगात पसरू शकत नाहीत काय?

''भारतातील **समुद्रराज** नावाच्या अयोध्येच्या सम्राटाने मिस्त (इजिप्तवर) देशावर आपले स्वामित्व स्थापन केले व नंतर हा प्रभाव अमेरिकेत गेला.

**(पण याला साम्राज्यविस्तार आणि परदेशात आक्रमण केले मानण्याचे कारण नाही. श्री गुलाबराव महाराजांचा विश्वव्यापक आर्य संस्कृतीचा सिद्धांत समजून घेतला की आपोआप या सर्वांची संगती सहज लागते.**



(३४)

**आपले साम्राज्य स्थापण्यासाठी किंवा धर्मांतरणासाठी हिंदूंनी गमनागमन कधीच केले नाही,**

हेही लक्षात घ्यावयास हवे.

## २३- ऋषींचे विश्वभ्रमण

**पोकॉक** (उपसंहार) -

''मी अत्यंत सावध राहून कठोर परिक्षणे केली आहेत. केवळ सिद्धांतच नव्हे तर शब्दांच्या समानतेमुळे मी आश्चर्यचकित झालो आहे. त्यांची एकरूपता आणि असंख्यता पाहून असे वाटते की प्राचीन अमेरिकेचे मनोवैज्ञानिक परीक्षण हे असे विलक्षण व्याकरण आहे की ज्याच्या अभ्यासामुळे आपल्या युरोपियनांच्या आक्रमक आणि जुन्या संस्कृतींचा विद्ध्वंस करणाऱ्या जगद्भ्रमणापेक्षा पूर्वीच्या प्राचीनभारतीय ऋषींचा सांस्कृतिक विश्वभ्रमणाचा वृतांत सत्य म्हणून स्वीकारावाच लागतो व त्याचे पुरावे आजही मोठ्या प्रमाणात सर्वत्र सापडतात.''



(३५)

## २४. पेरू देश

### सूर्यवंशी - पेरूवियन

**प्रख्यात अमेरिकन इतिहासकार जोन्स -**

''पेरू देशातील लोक रामाला सूर्यवंशी कौसल्यापुत्र आणि सीतापती मानतात. आणि पेरूवियन इंका संस्कृतीचे लोक स्वतःलाही अभिमानाने त्याच सूर्यवंशातील मानतात. आणि दसऱ्याचे वेळी **'रामसित्वोत्सव'** (रामलीला) रामसीता- उत्सव मोठ्या धुमधडाक्याने करतात.

### वेश्याविरहित देश

**भिक्षु चमनलाल** - मेक्झिको प्रमाणे पेरू देशातही ख्रिस्ती येण्यापूर्वीच्या आर्यसंस्कृतीची चिन्हे पहावयास मिळतात.

* लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवीत.
* वर्ण जातीचे भेद होते.
* आश्रमधर्माचे पालन करीत असत.
* पेरूचे लोक उद्योगशीलता, सदाचार आणि शिष्टतेसंबंधी विख्यात होते.



(३६)

* चोरीचे नाव नव्हते.
* देवता इंद्र स्वर्ग यावर त्यांची श्रद्धा होती.
* मुख्य म्हणजे **'वेश्या विरहित देश'** म्हणून पेरूची ख्याती होती. - **भिक्षु चमनलाल** (हिंदू अमेरिका )

## १९. स्त्रियांचे पावित्र्य

* अमेरिकेत जागोजागी मंदिरे होती.
* लोक रोगी बालकांना देवाला अर्पण करीत व ती बालके आमरण देवाची सेवा करीत.
* कुमारिकांनाही फार कठोर नियम आणि पवित्रता पालन करावी लागे.
* अजूनही मेक्झिकोतील प्राचीन संस्कृतीच्या मुली व स्त्रिया वडील पती किंवा भावाला बरोबर घेतल्या शिवाय संध्याकाळी रात्री बाहेर जात नाहीत.''- **भिक्षु चमनलाल** (हिंदू अमेरिका)

## २५- मेक्झिकोतील राज्याभिषेक

राज्यभिषेकाची पद्धत भारतीय होती. राजाच्या गळ्यांत जानवे असे. पुरोहित राज्याभिषेक करून राज्याच्या मस्तकावर राजमुकुट ठेवी. मृतराजाचा जेष्ठ पुत्र हा

जमिनीचा उपभोग घेई. - **भिक्षु चमनलाल** (हिंदू अमेरिका)

**२६-महाभारत**

**ह्युरेट** - हिंदूंनी आपल्याबरोबर मेकिक्सकोमधे - पांडवांचे १८ पर्वाचे महाभारत, वर्णाश्रम, व्यवसाय आणि भारतीय बाजारहाटाच्या पद्धती आणल्या.

**२७. ऑस्ट्रेलिया**

**सुदर्शन चक्र**

ऑस्ट्रेलियात सांपडणारे बरेच अवशेष भारताशी संबंधित असलेले आढळतात. तेथील रानटी लोक **'बूमरँग' नावाचे एक लाकडी हत्यार** वापरतात. याचा आकार बांकदार व टोकाकडे चपटा असून ते शत्रूस प्रहार करून फेकणाऱ्याकडे पुन्हा परत येते. शत्रूस प्रहार करूनही पुन्हा पुन्हा वर्तुळाकार गतीने परत येणाऱ्या व भारतात वर्णीलेल्या चक्राची (सुदर्शन चक्र) ही नक्कल असावी. (भा.श्रे.१११)

**२८. जावा - सुमात्रा**

**एलफिस्टन** - अमेरीकेतील पेरू देशाकडे





जाणाऱ्या लोकांनी जावा व सुमात्रा द्विपसमूहात वस्ती केली होती. हे लोक सूर्यवंशीय क्षत्रिय होते त्यांच्या पुराणकथा व ऐतिहासिक वीरकथा अजूनही तिकडील देवालयात चित्रित केलेल्या व ग्रंथात लिहलेल्या आढळतात.

कलिंगातील ब्राह्मणादि लोकांनी प्रथमतः जावा बेटातील मूळच्या लोकांना सुधारून राज्ये स्थापिली. तेथे त्यांचा जुना शक अद्याप चालू असून त्याचा आरंभ इसवी सन पूर्व ७५ आहे. (हिंदुस्थानचा इतिहास- पा. १६८)

**२९. बोर्नियो**

बोर्नियो या बेटावर हिंदू पुराणातील कथांची चित्रे काढलेली अनेक देवळे या बेटातील अर्न्तभागातही आहेत. किनाऱ्यापासून ४०० मैल आत असलेली देवळे तर फारच श्रेष्ठ शिल्पकलेची दर्शक आहेत. (भा.श्रे.११०)

**३०. बालीबेट**

जावाचे पूर्वेस असलेल्या बालीद्विपात तर





हिंदूलोकांचे वंशज राहत असून त्यात रामायण महाभारताच्या काव्याच्या प्रतीही त्यांच्या भाषेत आढळतात. सर्वत्र हिंदुपद्धतीने व्यवहार चालतात.

**३१. चीन**

**कर्नल टॉड** - चीनची मूळ वसाहतही मूळची हिंदुस्थानातील लोकांनीच केली. चीन व तार्तरी यातील प्राचीन वंशावळीत मूळ पुरुष **'अवर'** हा दिलेला आहे. तो पुरूरव्याचा पुत्र होता. (राजस्थानचा इतिहास भाग१.पा.३५)

चिनी लोकांच्या धर्म व संस्कृती यांचा उगम भारतात आहे. हे सांगावयाला नकोच. खुद्द चीन हे नांव संस्कृत असून बायबलात त्याचे रूप 'सिनिम' असे आढळते. (रॉयल एशिआटीक सोसायटी जर्नल भा.५) चीन-बर्बर-खशादयः क्षत्रियजातयः संस्कारलोपात् म्लेच्छत्वं गताः।।

**३१. जपान**

**रिंगतारो नागासाचा-**

जपानमधील सर्वमान्य शिण्टो पंडित श्री रिंगतारो





नागासाचा यांचे असे म्हणणे आहे की, ''प्राचीनकाळी बुद्धपूर्व काळात जपानला ब्राह्मोनोकयो (ब्राह्मणत्व) म्हणत असत. (India in Japan p. 83)

भिक्षू चमनलाला यांनी संशोधन केल्यानुसार त्यांच्या **हिंदू जपान** या पुस्तकात बुद्धपूर्व प्राचीन आर्यसंस्कृतीचे अनेक दाखले दिले आहेत त्यापैकी काही पाहू -

(१) सामुराई योध्याची **'हारकिरी'** (आत्मबलिदान) आणि राजस्थानातील राजपुतांचा **''जोहार''** एका समान मनोवृत्तीचे द्योतक आहेत.

(२) टोकियोमध्ये बुद्धपूर्व काळापासून अस्तित्वात असलेल्या मंदिरात इंद्राची मूर्ती आहे. तसेच भिंतीवर मस्त्यावतार - वराहावतार वगैरेंच्या चित्रावली सुशोभित आहेत.

(३) जपानची जुनी राजधानी **''नारा''** येथील प्राचीन बुद्धमंदिराच्या प्रवेशद्धारावर **'बेणु वाजविणाऱ्या श्रीकृष्णाची मूर्ती'** खोदलेली आहे.

(४१)

**समाज चालीरीती व संस्कार**

१- श्राद्ध- जपानी भाषेत **ओबोन** (पृ. १०५)
२- पितरांना भातांचे पिंड देऊन तृप्त करणे(पृ.१०६)
३- होमहवन - जपानी भाषेत **गोम.**
४- प्रातःकाळी पूर्वाभिमुख होऊन सूर्याची उपासना करणे.
५- मंदिरात **''ताईका''** म्हणजे घंटी वाजविणे.
६- **''नमो अमिदबुत्सु''** या मंत्राचा, १०८ मण्यांची माळ घेऊन जप करणे.
७- भारतातील कार्तिक स्नानाप्रमाणे **'कान-मास'** (जानेवारी ते फेब्रुवारी) महिन्यात प्रातःस्नान करणे.

**३२. पूर्व आशिया : कांबोडिया**

**विल्सन -** ब्रह्मदेशाप्रमाणे कांबोडीया हा शब्दही संस्कृतोत्पन्न आहे. कांबोजपासून **'कांबोडिया'** हे रूप बनले आहे. **एरियन** नामक ग्रीक इतिहासकाराने **''कोंबोस्थोली''** असे एका जातीचे नांव दिले आहे. त्याचे मूळरूप अर्थातच कंबस्थळ असे असले पाहिजे. कंबस्थळातील लोकांनी कंबजांनी/कांबोजांनी कांबोडियात



(४२)

वस्ती केली असली पाहिजे- **विल्सन**चे विष्णुपुराण भाग२पा.१८२)

या कांबोडियात १८८२ साली एक मोठ्या हिंदुदेवालयाचे अवशेष एका फ्रेंच संशोधकाने जमिनीतून उत्खनन करून बाहेर काढले.

०००





गुरुजी - ''हा आर्यांच्या गमन-आगमनाचा विषय महत्वाचा आहे. मांडणी चांगल्या रीतीने झाली पाहिजे. समतोलपणा नसेल तर लोक मुळीच लक्ष देणार नाहीत.''

मी - ''गुरुजी, एक विचारावयाचे आहे. .... उत्तर ध्रुव पूर्वी ओरिसात होता हे मत मला बरोबर वाटत नाही. तसे मानले तर लो. टिळकांचे मत बहुतांश खरे मानल्यासारखे होईल. आपल्या प्राचीन ग्रंथांतील पुराव्यांबद्दल अनास्था दाखवावी लागेल. 'पूर्वी आर्य लोक उत्तर ध्रुवाचरच रहात होते, त्यावेळी इतरत्र आर्यांची वसती नव्हती, आर्य शब्द वंशवाचक आहे' - वगैरे एकांगी निष्कर्ष काढण्यास वाव मिळेल. जगातील भिन्न भिन्न ठिकाणच्या उत्खननातील पुराव्यांतून सर्व जगात आर्यसंस्कृतीचे प्राचीन अवशेष आजही सांपडत



आहेत. त्यांना बाध येईल असे मला वाटते.''

गुरुजी - ''अरे, लो. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तर ध्रुव आजच्याच ठिकाणावर असला काय किंवा ओरिसा बिहारात असला काय, फारसा फरक पडत नाही. श्रीमहाराजांचा सिद्धांत या दोन्ही मतांपेक्षा व्यापक आहे. आणि निश्चितपणे सत्याला अधिक जवळचा आहे. **उत्तर ध्रुवप्रदेशात आर्य होते तेव्हा साऱ्या जगातही आर्य होतेच. हीच आर्यांची विश्वव्यापक संस्कृती नव्हे काय?**

तसेच ''आर्य हा वंश आहे'' ही कल्पना तर पाश्चात्य पंडितांनीही आतां चुकीची ठरविली आहे.

एकूण काय तर महाराजांच्या सिद्धांताने आर्यांचा उत्तर ध्रुवीय निवास वगैरे मते सपशेल चूक ठरत नाहीत तर एकांगी ठरतात.

- एप्रिल १९७३

(श्रीगुलाबराव महाराजांची विचार संपदा या प्रबंधाच्या, ''ऋणानुबंध'' या लेखातून)

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. ग्रीस - ग्रीक भाषेचा उगम संस्कृतातून | (५) |
| २. रोम - राम पासून रोम | (६) |
| ३. इटाली - धर्मविधींचे साम्य | (७) |
| ४ जर्मनी - भाषासाम्य | (७) |
| वेश आणि प्रातःस्नान | (८) |
| सूर्योपासना- प्रेतदहन- सतीची चाल- पुनर्विवाह | (८) |
| शर्मन् - जर्मन | (९) |
| सॅक्सन - शकसुनु | (९) |
| ५. हंगेरी - भाषा - चालीरीती - वंश | (१०) |
| ६. स्कँडनेव्हिया - नॉर्वे स्वीडन | (१०) |
| एद्द - वेद | (११) |
| असिगर्ड | (११) |
| पुराणे | (१२) |
| वारांची नावे | (१२) |
| ६. इंग्लंड - बौद्ध ब्राह्मण : 'ड्रुइड' | (१२) |
| पुनर्जन्म - तीन देवता | (१३) |
| शापदान | (१३) |
| हरहर महादेव | (१३) |
| बौद्ध अवशेष | (१४) |
| इंदुवंशीय | (१४) |







| | |
|---|---|
| रोमनांनी ब्रिटन जिंकल्यानंतर | (१४) |
| ७. पॅलेस्टाईन - प्राचीन लोकांचे साम्य | (१५) |
| ८. आशियामायनर - खाल्डिया - कुलदेव | (१६) |
| ९. इराण - पर्शिया - परशुराम | (१६) |
| मनुस्मृती | (१७) |
| ऐल - ऐर - एराण | (१८) |
| धर्म संकल्पनाचे साम्य | (१८) |
| ११. इस्लामपूर्व अरबस्थान | |
| अरेबिक लीपीतील भागवत | (१९) |
| १२. तुर्कस्थान - तुर्वसु राजाचे वंशज | (२०) |
| १३.खोरासान | (२०) |
| १४. बलीराजा | (२०) |
| १५. इजिप्त व इथिओपिया | |
| सिंधीलोक व प्राचीन इजिप्शीयन | (२१) |
| नांवे, शिल्प, भाषा यांचे साम्य | (२२) |
| वांशिक संकल्पना | (२३) |
| १६. आफ्रिका - अबुसिनीया : आफ्रिकेतील नावे | (२३) |
| १७. दक्षिण आफ्रिका | (२४) |
| सूर्याचा रथ | (२५) |
| १८. आशिया-युरोपचा उत्तर भाग | |
| 'सुमेरू व पेशवारून' | (२५) |
| १९. सैबेरिया - यादवांचे वंशज | (२६) |







| | |
|---|---|
| कृष्ण कथा | (२६) |
| २०. अमेरिका | (२७) |
| हिंदु-संस्कृतीचे संस्कार | (३०) |
| २१. सदाचार, सत्यप्रियत्व, कठोर शिक्षा | (३१) |
| २१. माया, इंका व आस्तिक संस्कृती | (३१) |
| २२. रामाची विजय-यात्रा | (३२) |
| २३- ऋषींचे विश्वभ्रमण | (३३) |
| २४. पेरू देश - सूर्यवंशी - पेरूवियन | (३४) |
| वेश्याविरहित देश | (३५) |
| १९. स्त्रियांचे पावित्र्य | (३५) |
| २५- मेक्झिकोतील राज्याभिषेक | (३६) |
| २६-महाभारत | (३६) |
| २७. ऑस्ट्रेलिया - सुदर्शन चक्र | (३७) |
| २८. जावा - सुमात्रा | (३७) |
| २९. बोर्नियो | (३८) |
| ३०. बालीबेट | (३८) |
| ३१. चीन | (३८) |
| ३१. जपान | (३९) |
| समाज चालीरीती व संस्कार | (४०) |
| ३२. पूर्व आशिया : कांबोडिया | (४१) |








